**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शनिवार दिनांक १७ जानेवारी २०२६**

**ठळक बातम्या**

1. **देशातील पहिल्या वंदे भारत शयनयान रेल्वेला प्रधानमंत्र्यांकडून हिरवा झेंडा; ३ हजार २५० कोटी रुपयांच्या रेल्वे आणि रस्ते पायाभूत प्रकल्पांचं उद्घाटन.**
2. **राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत यवतमाळ जिल्ह्यातील बेंबळा नदी प्रकल्पासाठी ४ हजार ७७५ कोटी रुपयांच्या खर्चास मंजुरी.**
3. **जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुका EVM ऐवजी बॅलेट पेपरवर घ्या- काँग्रेस नेते नाना पटोलेंचे राज्य निवडणूक आयुक्त मुख्यमंत्र्यांना पत्र.**
4. **विदर्भात थंडीचा कडाका कायम, गोंदिया जिल्ह्याचा पारा ८.२ अंश सेल्सिअस वर.**

**----------------------------------------**

पंतप्रधान-आसाम दौरा

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पश्चिम बंगाल आणि ईशान्य भारतात विकासकामांना वेग देणाऱ्या ३ हजार २५० कोटी रुपये खर्चाच्या विविध रस्ते आणि रेल्वे पायाभूत प्रकल्पांचं आज उदघाटन केलं. मालदा रेल्वे स्थानकातून हावडा, गुवाहाटी आणि कामाख्या दरम्यान धावणाऱ्या देशातील पहिल्या वंदे भारत शयनयान रेल्वेलाही आज दुरदृश्य प्रणालीद्वारे हिरवा झेंडा दाखवला. त्याबरोबरच चार आधुनिक अमृत भारत एक्सप्रेस रेल्वेगाड्यांनाही पंतप्रधानांनी हिरवा झेंडा दाखवला. शयनयान वंदे भारत रेल्वे पूर्णपणे वातानुकूलित असून प्रवाशांना परवडणाऱ्या दरात सेवा देणार आहे. यामुळे लांब पल्ल्याचा प्रवास जलद, सुरक्षित आणि अधिक सोयीस्कर होणार आहे. एकूण ८२३ प्रवाशांची क्षमता असलेल्या या रेल्वेत १६ आधुनिक कोच आहेत. याप्रसंगी पंतप्रधान म्हणाले...

***(होल्ड बाईट - पंतप्रधान नरेंद्र मोदी)***

***बंगाल की इस पावन भूमि से आज भारतीय रेल के आधुनिकीकरण की तरफ एक और बड़ा कदम उठाया गया। आज से भारत में वंदे भारत स्लीपर ट्रेनों की***

***शुरुआत हो रही है। ये नई वंदे भारत स्लीपर ट्रेन देशवासियों के लंबे सफर को और आरामदायक बनाएगी, यादगार बनाएगी। विकसित भारत की ट्रेनों ये कैसी होनी चाहिए, इस वंदे भारत स्लीपर ट्रेन में आप साफ साफ नजर आता है।***

राष्ट्रीय महामार्गाच्या धुपगुरी-फलकाता दरम्यान चौपदरीकरणाचं भूमिपूजनही मोदी यांनी यावेळी केलं. यामुळे, उत्तर बंगालमधील प्रादेशिक दळण वळणाला चालना मिळणार आहे.

----------------------------------------

ऑनलाइन गेमिंग

केंद्र सरकारनं ऑनलाइन गेमिंग कायद्याअंतर्गत मोठी कारवाई करत २४२ बेकायदेशीर सट्टेबाजी आणि जुगाराशी संबंधित संकेतस्थळं ब्लॉक केले आहेत. यामुळे आतापर्यंत बंद करण्यात आलेल्या अशा वेबसाइट्सची संख्या ७ हजार ८०० हून अधिक झाली आहे. ही कारवाई वापरकर्त्यांचं, विशेषतः युवकांचं संरक्षण करण्यासाठी तसंच अनियंत्रित ऑनलाइन सट्टेबाजीमुळे होणारे आर्थिक आणि सामाजिक नुकसान रोखण्यासाठी करण्यात आल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

----------------------------------------

इराण तणाव

इराणमधील वाढत्या तणावामुळं भारतीय नागरिक काल रात्री उशिरा नवी दिल्लीत पोहोचले आहेत. इराणमधील अस्थिर परिस्थिती आणि असुरक्षितता लक्षात घेता भारत सरकारनं आपल्या नागरिकांना इराण सोडण्याचं आवाहन केलं होतं. इराणहून परतलेल्या भारतीय नागरिकांनी सरकारच्या पाठिंब्याबद्दल आणि सहकार्याबद्दल आभार मानले आहेत. इराणमधील घडामोडींवर बारकाईनं लक्ष ठेवून आहोत आणि आपल्या नागरिकांची सुरक्षेसाठी वचनबद्ध असल्याचं भारतीय परराष्ट्र मंत्रालयानं म्हटलं आहे.

----------------------------------------

नक्षलवादी ठार

छत्तीसगडमध्ये बिजापूर जिल्ह्यात आज सुरक्षा दलांबरोबर झालेल्या चकमकीत दोन नक्षलवादी ठार झाले. जंगलाच्या वायव्य भागात नक्षलवादी असल्याची माहिती मिळाल्यावर पोलीस आणि सुरक्षा दलांच्या संयुक्त पथकानं इथं शोध मोहीम हाती घेतली. त्यावेळी लपून बसलेल्या नक्षलवाद्यांनी पथकाच्या दिशेनं

गोळीबार केला. प्रत्युत्तरादाखल सुरक्षा पथकानं केलेल्या गोळीबारात दोन नक्षली ठार झाले असून त्यांचे मृतदेह ताब्यात घेतल्याची माहिती पोलिसांनी दिली.

----------------------------------------

मंत्रिमंडळ निर्णय संक्षिप्त

आज झालेल्या, राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत यवतमाळ जिल्हयातील बेंबळा नदी प्रकल्पासाठी ४ हजार ७७५ कोटी रुपयांच्या खर्चास मंजुरी देण्यात आली असून, या प्रकल्पामुळे पाच तालुक्यांतील ५२ हजार ४२३ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. तसेच अमरावती जिल्हयातील मौजा धामक येथील पुनर्वसनाचा प्रश्न देखील प्राधान्याने मार्गी लागला आहे. याशिवाय अर्थ आणि सांख्यिकी संचालनालयाच्या १ हजार ९०१ पदांच्या सुधारित आकृतीबंधास आणि संचालनालयाचे नाव अर्थ आणि सांख्यिकी आयुक्तालय करण्यास मान्यता देण्यात आली. राज्यातील युवकांसाठी परदेशातील रोजगार संधी उपलब्ध करून देण्यासाठी 'महाराष्ट्र व्यापक आंतरराष्ट्रीय गतीशिलता व क्षमता संस्था (महिमा)' स्थापन करण्यास मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे.

----------------------------------------

अरुणोदय अभियान'

गोंदिया जिल्हयात महाराष्ट्र शासनाच्या 'अरुणोदय सिकलसेल ॲनिमिया विशेष अभियान' अंतर्गत १५ जानेवारी ते ७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत व्यापक तपासणी मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेत ० ते ४० वयोगटातील नागरिकांची सिकलसेल तपासणी सर्व शासकीय आरोग्य संस्थांमध्ये मोफत केली जाणार आहे. पॉझिटिव्ह आढळणाऱ्या रुग्णांना विशेष कार्ड देऊन पुढील तपासण्या आणि 'हायड्रॉक्सी युरिया' औषध मोफत उपलब्ध करून दिले जाणार आहे. जिल्हाधिकारी प्रजित नायर यांनी नागरिकांना पुढे येऊन तपासणी करून भावी पिढी सिकलसेल मुक्त ठेवण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

----------------------------------------

नाना पटोले

राज्यातील २९ महानगरपालिका निवडणुकांतील अत्यल्प मतदानामुळे निवडणूक प्रक्रियेवरील जनतेचा विश्वास कमी होत असल्याचा आरोप करत काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष आमदार नाना पटोले यांनी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका बॅलेट पेपरवर घ्याव्यात, अशी मागणी केली आहे. राज्याचे मुख्य

निवडणूक आयुक्त आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठवलेल्या पत्रात त्यांनी EVM वापराबाबत मतदारांमध्ये संशय असून अनेक राज्यांनी बॅलेट पेपरचा पर्याय स्वीकारल्याचे नमूद केले. मतदार यादीतील घोळ, मतदान केंद्रांवरील गैरसोयी, VVPAT चा वापर न होणे व शाई पुसली जाणे या बाबी गंभीर असल्याचे त्यांनी सांगितले. या प्रकारांमुळे निवडणूक प्रक्रियेची पारदर्शकता व निष्पक्षतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. लोकशाहीच्या आरोग्यासाठी जनभावनेचा आदर करून आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका बॅलेट पेपरवर घ्याव्यात, असे आवाहन नाना पटोले यांनी केले आहे.

-----------------------------------------

उद्धव ठाकरे

मुंबई महापालिका निवडणुकांच्या निकालानंतर शिवसेना भवनात घेतलेल्या पत्रकार परिषदेत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी भाजपवर टीका केली. कागदावर शिवसेना संपवली असली तरी जमिनीवरची शिवसेना संपवता येत नाही, हे निकालांनी सिद्ध केल्याचे त्यांनी सांगितले. मुंबईत ६५ उमेदवार निवडून आल्याबद्दल त्यांनी मतदारांचे आभार मानले. भाजपचा विजय डागाळलेला असून यंत्रणेचा दुरुपयोग, नियम बदल आणि शाई पुसली जाण्याच्या प्रकारांवरून भाजप जमिनीवर मजबूत नसल्याचा आरोप उद्धव ठाकरे यांनी केला.

-----------------------------------------

विधी सेवा महाशिबिर

फेब्रुवारी महिन्यात यवतमाळ जिल्ह्यातील नेर तालुक्यात विधी सेवा महाशिबिर आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, या शिबिरात दारव्हा आणि बाभुळगाव तालुक्यांचा समावेश राहणार आहे. शिबिराच्या माध्यमातून नागरिकांना विविध शासकीय आणि कल्याणकारी योजनांची माहिती देऊन पात्र लाभार्थ्यांना प्रत्यक्ष लाभ देण्यात येणार आहे. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष शेखर चु. मुनघाटे यांच्या मार्गदर्शनाखाली या संदर्भात आढावा बैठक पार पडली.

-----------------------------------------

हवामान

विदर्भात आज गोंदिया जिल्ह्यात ८.२ अंश सेल्सिअस इतक्या सर्वात कमी किमान तापमानाची नोंद करण्यात आली. गोंदिया पाठोपाठ यवतमाळ इथं १० अंश सेल्सिअस तर नागपुर इथं १०.२ अंश सेल्सिअस इतकं किमान तापमान नोंदवण्यात आलं. उर्वरित जिल्ह्यांमध्ये तापमान 11 अंश सेल्सिअस ते पंधरा अंश सेल्सिअस दरम्यान आहे.

-----------------------------------------

उमेद

वाशीम इथं महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) अंतर्गत महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तू आणि खाद्यपदार्थांची तीन दिवसीय 'सरस' प्रदर्शनी आणि वऱ्हाडी जत्रा आयोजित करण्यात आली आहे. वाशीम जिल्हा क्रीडा संकुलात १६ ते १८ जानेवारी दरम्यान सुरू असलेल्या या प्रदर्शनीचे उद्‌घाटन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या हस्ते झालं. या जत्रेत महिला बचत गटांचे ६० स्टॉल्स उभारण्यात आले असून विविध खाद्यपदार्थ, हस्तकला आणि शोभेच्या वस्तू विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

-----------------------------------------

घनकचरा

वर्धा शहरालगत वळण रस्त्यावर मोठ्या प्रमाणात घनकचरा टाकला जात असल्याने आरोग्य आणि प्रदूषणाचा प्रश्न गंभीर बनला आहे. यावर उपाययोजना करण्यासाठी वर्धा जिल्हा प्रशासनाने त्रीसदस्यीय समिती गठीत केली असून शहरालगतच्या ११ ग्रामपंचायतींनी सहकार्य करण्याच्या सूचना पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी दिल्या. घनकचरा व्यवस्थापनासाठी तीन झोन तयार करून कचरा झोननिहाय डंपिंगयार्डमध्ये जमा केला जाणार आहे. कचरा वाहतुकीसाठी प्रशासन वाहन उपलब्ध करून देणार असून उघड्यावर कचरा टाकणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई केली जाणार आहे. प्लास्टिक वापर रोखण्यासाठी जनजागृती आणि कडक कारवाईचे निर्देशही जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत.

-----------------------------------------

रास्तारोको आंदोलन

लाडकी बहिण योजनेचे पैसे दोन महिन्यांपासून प्रलंबित असल्याच्या कारणावरुन भंडारा शहरात महिलांनी राष्ट्रीय महामार्ग नागपूर नाका इथं रास्तारोको आंदोलन

केलं आहे. भंडारा शहरातील अनेक महिलांचे अर्ज बाद झाल्यामुळे त्यांनी हे पाऊल उचलल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

---------------------------------------

निवडणूक निकाल

राज्यातल्या २९ महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी काल मतमोजणी झाल्यावर रात्री उशिरा अंतिम निकाल आले. या निकालांनुसार भारतीय जनता पक्षानं १ हजार ४२५ जागा जिंकून राज्यात वर्चस्व गाजवलं आहे. शिवसेनेनं ३९९, काँग्रेसनं ३२४, राष्ट्रवादी काँग्रेसनं १६७, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं १५५, एमआयएमनं ११३, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानं ३६, मनसेनं १३ आणि बसपानं ६ जागा जिंकल्या आहेत.नागपूर महानगरपालिकेच्या १५१ जागांपैकी भाजपनं १०२ तर काँग्रेसनं ३४ जागा जिंकल्या. अमरावतीत ८७ जागांपैकी भाजपनं २५, एमआयएमनं ११, युवा स्वाभिमान पक्षानं १६ आणि काँग्रेसनं १५ जागांवर विजय मिळवला. अकोल्यात ८० जागांपैकी भाजपनं ३८, काँग्रेसनं २१ आणि वंचित बहुजन आघाडीनं ९ जागा जिंकल्या आहेत. चंद्रपूरमध्ये ६६ जागांपैकी काँग्रेसनं २७ आणि भाजपनं २३ जागांवर विजय मिळवला.

---------------------------------------